"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"
या बाबीची दर निश्चितीबाबत.

# महाराष्ट्र शासन

## उद्योग संचालनालय,

नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.

आदेश क्रमांक.उसं/भांखस/फाईल पॅड व फाईल कव्हर्स/दरनिश्चिती/२०२०-२१/(२७)/२०१९/ॐ-8559

दिनांक:- 18 AUG 2020

वाचा :-१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६
२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.२०/०७/२०२० रोजीचे इतिवृत्त.

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समितीमार्फत करण्यात येते. त्यानुसार **"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"** या बाबीची **सन २०२०-२१** या वर्षासाठी सन २०१९-२० या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी **मे. प्रेरणा ट्रस्ट संचालीत अपंग कार्यशाळा, औरंगाबाद** या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दि.२०/०७/२०२० रोजीच्या बैठकीत **"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"** या बाबीची सन २०१८-१९ मध्ये निश्चित केलेले दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. **"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"**बाबीचे निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | वस्तूंचे नाव | विनिंदेश | दर प्रत्येकी (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | फाईल पॅड / (केस बोर्ड) | **Case Board** (Item No. d.215) Size 24 cms, & 36 cms.<br>(to be manufactured from specification)<br>a) 91 DKG straw Board of 1887 GSM and size 61x86 cms. as per Grade A.<br>b) Strong while ape having a length of 98.5 cm and width of 1.25 cm. It should have a good selage. It should have a wrap of 2/20 and wett. of 2/10 with 48 ends 22 picks per 25.4 cm.<br>c) Superior binding cloth in the size 61 x 10 cm. It should be suitably strengthened by pecting catridge paper on the rough side. It should have 60 ends and 48 Picks per 2.54 mm. and should have a weight of 0.23 Kg. Per sq. Meter.<br>d) While catridge in the size 61 x 10 cms. 100 GSM.<br>e) Paper in the size 35.5 x 23.5 cms. 10 GSM | १४.०० |
| २ | फाईल कव्हर | **File Covers as per (Sectt.)**<br>24 BM Board duly printed with clothing (4"X14") inside and outside cloth duly punched leaving a distance of 3" between two punched holes these hiles should be in the entry of the Board.२४x ३६ सें.मी. (बाब क्र.२४ बीएम) २८० जीएसएम आणि किमान चिंधीचे प्रमाण ५० टक्के | १०.०० |

सदर दरनिश्चितीची विधिग्राहयता दि.३०/०४/२०२१ पर्यंत राहील. फाईल पॅड व फाईल कव्हर्स या बाबीसाठी जर वस्तू व सेवा कर (GST) लागू असेल, तर बाबींकरीता GST हा वर नमूद केलेल्या दरावर अतिरिक्त राहील. सदर दर खरेदीद्वाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहे.

संस्थेनी स्वत: उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा, बाजारातून वस्तू विकत घेवन शासनास पुरवठा करु नये. संस्थेच्या अंध व अपंग व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयांनी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावेत.

**पुरवठा कालावधी:-** मागणीपत्र मिळाल्यापासून ०६ आठवड्याच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर मालाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तू पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची पोच पुरवठा आदेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) विहीत कार्य कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या कामाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) विहीत कार्य कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणा-या मालाची/ वस्तूची गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकते नुसार करावी.

वरील संस्थेने शासकीय कार्यालयात फाईल पॅड व फाईल कव्हर्स यांचा पुरवठा केल्याबाबतचा अहवाल वस्तूनिहाय प्रत्येक महिन्याला मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**

**प्रति,**

१) मे. प्रेरणा ट्रस्ट संचालीत अपंग कार्यशाळा, सुभेदारी गेस्ट हाऊस समोर, रंगीन दरवाजा जवळ, औरंगाबाद -४३१ ००१.

२) निवड नस्ती.